# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.६६५६/२०२२/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.संजय कारभारी कुटे<br>रा.कुटे मळा, मु.पो.बेलतगव्हाण,<br>ता.जि.नाशिक ४२२ ४०१. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण.<br>ता.जि.नाशिक. | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती, नाशिक.<br>ता.जि.नाशिक. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.२८/०७/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये मोहनीश वसंत दोंदे सरपंच झाल्यापासून दि.१५/०२/२०२१ पासून यांच्या कालावधीत विकास कामे झालेल्या कामांची माहि मिळावी व ग्रामनिधी दि.१५/०२/२०२१ ग्रा.पं.बेलतगव्हाण जमा खर्चाचे तेरीजची माहिती मिळावी व कर वसूल पत्रक दि.१५/०२/२०२१ पासून माहिती मिळावी. व ग्रापं.मार्फत जि.प.शाळा येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहे त्याच्या ईस्टीमेटच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या व ते कोणत्या कंपनीचे बसविले आहे त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळावी. सीसीटीव्ही कॅमेरे सरपंच मोहनीश वसंत दोंदे यांच्या कालावधीत बसवले आहे. वरीलप्रमाणे माहिती सही, शिक्के दिनांक टाकून मिळावी अशी माहिती अपिलार्थी यांनी मागितली आहे. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.१०/१२/२०२४ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण ता.जि.नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. उपरोक्त द्वितीय अपिल प्रकरणी आयोगासमोर दि.१०/१२/२०२४ रोजी सुनावणीवेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण ता.जि.नाशिक (श्री.लक्ष्मीकांत प्रकाश पटेल) हे उपस्थित असल्याचे दिसून येते. तरीदेखील आयोगाच्या उपरोक्त नमूद आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण ता.जि.नाशिक (श्री.लक्ष्मीकांत प्रकाश पटेल) यांनी आयोगाकडे अद्यापपर्यंत कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. यावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण ता.जि.नाशिक (श्री.लक्ष्मीकांत प्रकाश पटेल) यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.६६५६/२०२२/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक.

---

जावक क्र. ८२०८ दिनांक :- 4 DEC 2025